**खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे,**

# साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय, राजगुरूनगर

ता. खेड, जि. पुणे- 410 505

(शैक्षणिक वर्ष 2021 - 2022 पासून)

वर्ग:- तृतीय वर्ष कला शाखा (T.Y.B.A.)

अर्थशास्त्र विभाग

विषय:- व्यवसाय व्यवस्थापन -I

सेमिस्टर :- V

मार्गदर्शक प्राध्यापक

डॉ. उमेश भोकसे

## प्रकरण तिसरे

## 3. शासकीय/सरकारी योजना

३. प्रस्तावना:-

भारतात गुंतवणुकीसाठी अनुकूल वातावरण निर्माण करणे, आधुनिक आणि कार्यक्षम पायाभूत सुविधा विकसित करणे आणि विदेशी गुंतवणुकीसाठी नवीन क्षेत्रे उघडणे, तरुणांना व्यावसायिक आणि उद्योजक बनण्याची संधी उपलब्ध करून देणे, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि महिला या प्रवर्गातील घटकांना आर्थिक विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे, आणि त्यासाठी वित्त सहाय्य पुरविणे अर्थात, भारतात व्यवसाय आणि व्यापार करण्याची प्रक्रिया अधिक सुलभ करण्यासाठी सरकारने अनेक पावले उचलली आहेत. सरकारने उचललेली पावले व योजनांचा आढावा प्रस्तुत प्रकरणात घेण्यात आला आहे.

३.१ मेक इन इंडिया:-

मेक इन इंडिया हा भारत सरकारचा एक उपक्रम आहे, ज्यायोगे कंपन्यांना भारतात बनवलेली उत्पादने विकसित करणे, उत्पादन करणे आणि असेंबल करणे आणि उत्पादन क्षेत्रात समर्पित गुंतवणूकीला प्रेरणा देणे यासाठी प्रोत्साहन दिले जाते. गुंतवणुकीसाठी अनुकूल वातावरण निर्माण करणे, आधुनिक आणि कार्यक्षम पायाभूत सुविधा विकसित करणे आणि परदेशी भांडवल (गुतवणुकीसाठी) नवीन क्षेत्रे उपडणे या

धोरणात्मक दृष्टिकोनाबरोबरच सरकार आणि उद्योग यांच्यात भागीदारी निर्माण करणे हे या योजनेचे ध्येय आहे.

३.१.१. सुरुवात/प्रारंभ:-

उत्पादनाला चालना आणि प्रोत्साहन देण्यासाठी, माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी २५ सप्टेंबर २०१४ रोजी 'मेक इन इंडियाची' सुरवात केली. ज्यायोगे भारताला महत्त्वपूर्ण गुंतवणूक आणि उत्पादन, पायाभूत सुविधा आणि नवोपक्रमाच्या जागतिक केंद्रात रूपांतरित केले जाईल,

३.१.२ मेक इन इंडियाची उद्दिष्टे :-

देशातील उत्पादन क्षेत्रावर लक्ष केंद्रित करणे आणि उद्योजकतेला चालना देण्याच्या उद्देशाने मेक इन इंडियाची उद्दिष्टे पुढे दिल्याप्रमाणे निश्चित करण्यात आलेली आहेत,

१. मध्यम कालावधीत उत्पादन क्षेत्राचा विकास दर वार्षिक १२ ते १४% ने वाढविणे.

२. २०२२ पर्यंत देशाच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनातील (GDP) उत्पादनाचा वाटा १६ % वरून २५% 'पर्यंत वाढविणे.

३. सन २०२२ पर्यंत उत्पादन क्षेत्रात १०० दशलक्ष अतिरिक्त रोजगाराच्या संधी निर्माण करणे.

४. सर्वसमावेशक वाढीसाठी ग्रामीण स्थलांतरित आणि शहरी गरीबांमध्ये योग्य कौशल्ये निर्माण करणे.

५. उत्पादनामध्ये देशांतर्गत मूल्यवर्धन आणि तांत्रिक खोलीत वाढ करणे.

६. भारतीय उत्पादन क्षेत्राची जागतिक स्पर्धात्मकता वाढवणे.

७. शाश्वत विकास (Sustainable Development) विशेषतः पर्यावरणाच्या संदर्भात सुनिश्चित करणे.

३.१.३ समाविष्ट क्षेत्रे:-

मेक इन इंडिया उपक्रमांतर्गत खालील २५ क्षेत्रे समाविष्ट आहेत.

१. ऑटोमोबाईल घटक

२. ऑटोमोबाईल्स

३. विमानचालन

४. जैवतंत्रज्ञान

५. रसायने

६. उत्पादन

७. संरक्षण उत्पादन

८. इलेक्ट्रिकल मशिनरी
९. बँक प्रणाली
१०. अन्न प्रक्रिया
११. माहिती तंत्रज्ञान आणि व्यवसाय प्रक्रिया व्यवस्थापन (IT & BPM)
१२. लेदर
१३. मीडिया आणि मनोरंजन
१४. खाणकाम
१५. तेल आणि वायू
१६. फार्मास्युटिकल्स
१७. बंदरे आणि शिपिंग
१८. रेल्वे
१९. रस्ते आणि महामार्ग
२०. अक्षय ऊर्जा
२१. अवकाश आणि खगोलशास्त्र
२२. कापड आणि वस्त्रे
२३. थर्मल पॉवर
२४. पर्यटन
२५. कल्याण आणि आरोग्य सेवा

३.१.४ राज्य पातळीवरील स्थानिक उपक्रम:-

मेक इन इंडियाच्या अनुषंगाने, वैयक्तिक राज्यांनी देखील त्यांचे स्वतःचे स्थानिक उपक्रम सुरू केले. जसे, ''मेक इन ओडिशा', 'तामिळनाडू ग्लोबल इन्व्हेस्टर्स मीट', 'व्हायजरात', 'हॅपनिंग हरियाणा' आणि 'मॅग्नेटिक महाराष्ट्र' इत्यादी.

भारतात व्यवसाय करण्याची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी सरकारने अनेक पावले उचलली आहेत. अनेक नियम आणि कार्यपद्धती सुलभ करण्यात आल्या आहेत. तसेच अनेक बाबी परवाना आवश्यकतांमधून काढून टाकण्यात आल्या आहेत. परिणामी मेक इन इंडिया उपक्रमाला देश-विदेशातून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. जपान, चीन, फ्रान्स आणि दक्षिण कोरियासारख्या अनेक देशांनी विविध औद्योगिक आणि पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये भारतात गुंतवणूक करण्यास आपला पाठिंबा दर्शविला आहे.

निष्कर्ष:-

मेक इन इंडिया ही एक क्रांतिकारी योजना आहे, जिच्या माध्यमातून गुंतवणुक आणि नवनिर्मितीला प्रोत्साहन देणे, बौद्धिक संपत्तीचे संरक्षण करणे आणि देशात जागतिक दर्जाच्या उत्पादन पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी प्रमुख नवीन उपक्रम सुरू केले आहेत. या उपक्रमामुळे भारतात व्यवसाय करण्याची संपूर्ण प्रक्रिया सुलभ झाली आहे.

३.२ स्टार्ट अप इंडिया:-

स्टार्टअप इंडियाची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या २०१५ च्या स्वातंत्र्यदिनी भाषणात केली होती. देशातील तरुणांना मदत करण्यासाठी मोदी सरकारची ही प्रभावी योजना आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तरुणांना उद्योगपती आणि उद्योजक बनण्याची संधी उपलब्ध करून देण्यासाठी हा पुढाकार घेतला आहे. या प्रमुख उपक्रमाचा उद्देश देशामध्ये नवकल्पना आणि स्टार्टअप्सचे पालनपोषण करण्यासाठी एक मजबूत इको-सिस्टम तयार करणे आहे. ज्यामुळे शाश्वत आर्थिक वाढ होईल आणि मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होईल.

३.२.१ स्थापना/प्रारंभः-

स्टार्टअप इंडियाचा शुभारंभ पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी १६ जानेवारी २०१६ रोजी केला. या योजनेच्या कृती आराखड्यात १९ कृती बाबींचा समावेश आहे. स्टार्टअप इंडिया हा कार्यक्रम भारत सरकारच्या औद्योगिक धोरण आणि प्रोत्साहन विभाग (Department For Promotion of Industry And Internal Trade DPIIT) द्वारे व्यवस्थापित केला जातो.

३.३.२ स्टार्ट अप योजना काय आहे?

स्टार्ट अप इंडिया भारत सरकार संचलित अशी योजना आहे, ज्यात देशातील तरुणांना बँकांद्वारे वित्तपुरवठा करणे, रोजगार निर्मिती, उद्योजकता आणि आर्थिक विकास इत्यादी बाबींना प्रोत्साहन देण्यात येते. याशिवाय या योजनेअंतर्गत स्व-अनुपालन करांमध्ये सवलती, पेटंट प्रक्रियेसाठी जलद गती अर्ज, सरकारी निविदा काढण्यासाठी बाणा ठेवी (Deposit) बाबत सवलत, उलाढाल आणि अनुभवाची आवश्यकता यामध्ये सुट इत्यादीची तरतुदीचे प्रावधान करण्यात आलेले आहे.

३.२.३ स्टार्टअप इंडिया योजनेचा कृती आराखडा:-

१. जलत कार्यप्रणाली-

स्टार्ट अप इंडिया योजनेअंतर्गत प्रारंभ करण्यात आलेल्या कंपन्यांना आपले कार्य करणे सुलभ व्हावे यासाठी या योजनेत सरकारने पुढील पावले उचलली आहेत.

१. सरकारने स्टार्टअप इंडिया हबची स्थापना केली आहे, जिथे निगमन, नोंदणी, तक्रार हाताळणी इत्यादीशी संबंधित सर्व कामे जलद गतीने केली जातात.
२. कुठूनही आणि केव्हाही नोंदणी करणे मुलभ करण्यासाठी सरकारने एक अर्ज आणि ऑनलाइन पोर्टल (एक खिडकी योजना) सुरू केलेले आहे.
३. स्टार्टअपसाठी पेटंट संपादन करणे आणि त्यासंबंधीची नोंदणी प्रक्रिया जलद स्वरूपाची आहे.
४. नादारी आणि दिवाळखोरी विधेयक २०१५ नुसार स्टार्टअप अंतर्गत कार्यरत असलेल्या आणि तोट्यात चाललेल्या, त्याशिवाय दिवाळखोरी मध्ये निपातेल्या कंपन्या बंद करण्यासाठी (समाप्ती साठी) जलदगतीची सुविधा प्रदान करून देण्यात आलेली आहे, ज्यानुसार स्टार्ट अप कंपनी ९० दिवसाच्या आत बंद करता येते.

२. वित्त सहाय्य-
स्टार्टअपना प्रोत्साहन देण्यासाठी सरकार विविध आर्थिक मदत पुरवते. वित्त सहाय्य पुरविण्यासाठी सरकारने उचललेली पावले पुढीलप्रमाणे.
१. सरकारने ४ वर्षांसाठी (प्रत्येक वर्षी रु. २५०० कोटी रुपये) १०,००० कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. अशा निधीतून सरकार विविध स्टार्टअप्समध्ये गुंतवणूक करते.
२. भांडवली नफ्यावर आयकरातून सूट विशेष निधी प्रदान केला जातो.
३. स्टार्ट अप इंडिया योजनेच्या माध्यमातून उभारलेल्या उद्योगांसाठी पहिल्या ३ वर्षांसाठी आयकर सवलत उपलब्ध आहे.
४. आयकर कायद्याअंतर्गत, जेथे स्टार्टअप (कंपनी) समभागांच्या वाजवी बाजार मूल्यापेक्षा जास्त असलेल्या समभागांच्या जारी करण्यासाठी कोणताही मोबदला प्राप्त करते. अशा अतिरिक्त मोबदला प्राप्तकर्त्याच्या हातात इतर स्रोतांकडून मिळकत म्हणून करपात्र असतो.
५. स्टार्ट अप मधील उपक्रम भांडवल निधीद्वारे केलेल्या गुंतवणुकीला या तरतुदीच्या अर्जातून सूट देण्यात आली आहे..
३.२.४ स्टार्टअप इंडिया योजनेचे फायदे:-
१. आर्थिक लाभः-
बहुतांश स्टार्टअप पेटंट वर आधारित असल्याने ते अद्वितीय वस्तू किंवा सेवा तयार करतात. त्यांना पेटेंट नोंदणीसाठी मोठ्या प्रमाणात खर्चाची आवश्यकता असते. या योजनेअंतर्गत सरकार पेटेंट खर्चावर ८० टक्के सूट देते.
२. प्राप्ती कर लाभः-

स्टार्ट अप इंडिया योजनेच्या माध्यमातून स्थापन केलेल्या उद्योगांसाठी पहिल्या ३ वर्षांसाठी उत्पन्न करासाठी (Income Tax) १००% सूट उपलब्ध आहे. परंतु आंतर मंत्रिमंडळाकडून प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच कंपन्यांना त्याचा लाभ घेता येतो.

३. नोंदणीचे लाभः-

कोणताही व्यवसाय कार्यरत करण्यापेक्षा त्याची स्थापना आणि नोंदणी करणे हे खूप कठीण कार्य असते. या योजने अंतर्गत नोंदणी सुलभ करण्यासाठी एक खिडकी योजना चालू करण्यात आलेली आहे. ज्याद्वारे नोंदणी, शंका आणि समस्या तात्काळ सोडविल्या जातात.

४. सरकारी लाभः-

अधिक देयके (Payment) आणि मोठ्या प्रकल्पामुळे प्रत्येक व्यवसाय संस्था ही सरकारी निविदा प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करतात, परंतु सरकारी निविदा घेणे अवघड कार्य असते. या योजने अंतर्गत स्टार्टअप उद्योगांना सरकारी निविदा काढण्यात प्राधान्य देण्यात येते. तसेच निविदा काढण्यासाठी कोणत्याही पूर्व अनुभवाची आवश्यकता नाही.

५. नेटवर्किंगच्या संदर्भातील मोठ्या संधी:-

नेटवर्किंग म्हणजे विशिष्ट ठिकाणी किंवा वेळी विशिष्ट भागधारकांना भेटण्याची संधी होय. नेटवर्किंगसाठी सरकार देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर दरवर्षी २ स्टार्टअप प्रदर्शनाचे आयोजित करते. त्याशिवाय स्टार्टअप इंडिया योजना बौद्धिक संपदा जागरुकता कार्यशाळा देखील आयोजित करते. त्यामुळे स्टार्टअप कंपन्यांना नेटवर्किंगच्या संधी प्राप्त होतात.

३.२.५ स्टार्टअप इंडिया योजनेअंतर्गत नोंदणीसाठी पात्रता:-

१. स्थापन होणारी कंपनी ही भागीदारी संस्था खाजगी मर्यादित कंपनी किंवा मर्यादित दायित्व भागीदारी फर्म असावी.

२. कंपन्यांनी औद्योगिक धोरण आणि प्रोत्साहन विभागाकडून मान्यता प्राप्त केलेली असावी.

३. व्यवसाय संस्था किंवा कंपनीस उष्मायनाद्वारे (Incubation) शिफारस पत्र असणे आवश्यक आहे.

४. व्यवसाय संस्था किंवा कंपनीने नाविन्यपूर्ण योजना किंवा उत्पादने प्रदान करणे आवश्यक आहे.

५. ती नवीन व्यवसाय संस्था असावी किंवा पाच वर्षापेक्षा जुनी नसावी.

६. कंपनीची एकूण उलाढाल ही २५ कोटी पेक्षा जास्त नसावी.

७. ही व्यवसाय संस्था आधीपासून अस्तित्वात असलेल्या कंपनीचे विभाजन किंवा पुनर्बांधणी झालेले असू नये.

३.२.६ स्टार्ट अप योजनेची प्राप्ती परिणामकारकता:-

भारत सरकारच्या उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभागाच्या अहवालानुसार, १४ जुलै २०२१ पर्यंत देशात ५२,३९१ नवीन स्टार्टअप उपडण्यात आले असून, ५.१७,००० हजारांहून अधिक लोकांना रोजगार मिळाला आहे. नवीन स्टार्टअप्समध्ये ५३ युनिकॉर्न (ज्यांचे बाजारमूल्य किमान एक अब्ज डॉलर म्हणजे साडेसात हजार कोटी रुपये आहे) तयार झाले आहेत.

उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभागाकडे २०१६ मध्ये केवळ ५०४ स्टार्टअप उद्योगांची नोंदणी करण्यात आली होती. २०१७ मध्ये ५,००० पेक्षा अधिक. २०१८ मध्ये १,००० पेक्षा अधिक, २०१९ मध्ये ११,००० पेक्षा अधिक, २०२० मध्ये १४ हजाराहून अधिक तर २०२१ मध्ये जुलै पर्यंत ११ हजाराहून अधिक स्टार्टअप उद्योगांची नोंदणी करण्यात आलेली आहे.

संपूर्ण जगात स्टार्टअप्सच्या संख्येच्या बाबतीत, अमेरिका आणि चीननंतर भारत जगात तिसऱ्या क्रमांकावर आहे आणि भारत स्टार्टअपची सर्वांत मोठी इकोसिस्टम बनवत आहे.

थोडक्यात स्टार्टअप इंडिया देशामध्ये रोजगारात वाढ घडून आणणे. युवकांना उद्योजक बनवणे आणि देशाचा जलद गतीने विकास घडून आणण्यासाठीचा भारत सरकारचा एक अर्थपूर्ण प्रयत्न आहे.

३.३ स्टँड अप इंडिया योजना:-

भारतातील तळागाळातील लोकांना व महिलांना व्यवसाय आणि उद्योजकतेचे प्रोत्साहन देण्यासोबतच त्यांचे आर्थिक सक्षमीकरण घडवून आणणे आणि रोजगारनिर्मिती करण्यासाठी भारत सरकार द्वारे 'स्टैंड अप 'इंडिया' योजना निर्माण केलेली आहे. योजनेचे उदिष्ट प्रत्येक बँकेच्या शाखेद्वारे विमान एक अनुसूचित जाती (SC) किया अनुसूचित जमाती (ST) कर्जदार आणि एक महिला कर्जदार यांना नवीन (ग्रीनफिल्ड) प्रकल्प उभारण्यासाठी अर्थसहाय्य प्रदान करणे हा आहे.

३.३.१ घोषणा आणि सुरुवात / प्रारंभ:-

माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी १५ ऑगस्ट २०१५ रोजी त्यांच्या स्वातंत्र्य दिनानिमित्त केलेल्या भाषणादरम्यान स्टैंड अप इंडिया प्रारंभ करण्याची घोषणा केली. महिला आणि अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीमधील उद्योजकतेला पाठिंबा देण्याच्या सरकारच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ५ एप्रिल २०१६ रोजी स्टैंड अप इंडिया योजना सुरू केली.

३.३.२ संकल्पना:-

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि महिला उद्योजकांकडून उत्पादन, सेवा, कृषी-संत किंवा व्यवसाय क्षेत्रात नवीन उद्योग व्यवसाय सुरू इच्छिणाऱ्या घटकास १० लाख ते १ कोटी रुपयांपर्यंतचे कर्ज सुविधा प्रदान करण्याच्या तरतुदीचे प्रावधान स्टैंड अप इंडिया योजनेत करण्यात आलेले आहे. ही योजना आर्थिक सेवा विभागाच्या (Department of Finance Services) उपक्रमाचा एक भाग आहे.

३.३.३ योजनेसाठी आवश्यक पात्रता:-

१. कर्जासाठी अर्ज करणारा अर्जदार अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST) किंवा महिला वर्गातील उद्योजक असावा.

२. लाभार्थी म्हणजेच अर्जदाराचे वय किमान १८ वर्षे असावे.

३. शासनाची ही कर्ज योजना फक्त हरित क्षेत्र प्रकल्पासाठी आहे. म्हणजेच कर्ज घेणारा लाभार्थी हा पहिला व्यावसायिक (पहिल्यांदाच व्यवसाय/ उद्योगात पदार्पण करणारा) असावा.

४. हे कर्ज फक्त उत्पादन किंवा सेवा किंवा व्यवसाय क्षेत्र (सेवा किंवा उत्पादन किंवा व्यापार क्षेत्र) साठी दिले जाते.

५. या कर्जासाठी हे सर्वात महत्वाचे आहे की, अर्जदाराला कोणत्याही बँकेने किंवा संस्थेने कर्ज देण्यास किंवा कर्ज परतफेड करण्यास असमर्थ असल्याचे (Defaulter) घोषित केलेले असू नये.

६. जर लाभार्थीचा स्वतःचा व्यवसाय नसेल आणि त्याची एखाद्या व्यवसायात भागीदारी असेल तर साभार्थ्यांचा व्यवसायातील हिस्सा किमान ५१% असावा.

३.३.४ स्टँड-अप इंडिया योजनेची वैशिष्ट्ये:-

१. स्टँड-अप योजनेसाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि महिला या प्रवर्गातील लाभार्थाचे म्हणजेच अर्जदाराचे वय किमान १८ वर्षे असावे.

२. स्टँड अप इंडिया योजनेनुसार कोणत्याही बिगर वैयक्तिक व्यवसाय (Non-individual) किंवा उद्योगात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती (SC/ST) किंवा महिलांची हिस्सेदारी कमीत कमी ५१ टक्के असली पाहिजे,

३. स्टँड अप इंडिया योजने अंतर्गत प्राप्त होणारे कर्ज फक्त ग्रीन फील्ड प्रकल्पांसाठी ( नवं उद्योजक) प्रदान केले जाते. म्हणजेच असे उद्योजक जे पहिल्यांदाच उत्पादन किंवा व्यापार क्षेत्रात पाऊल टाकत आहेत.

४. या योजनेला वर्ष २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

५. अर्जदारास यापूर्वी कोणी बैंक किंवा गैर बैंक वित्तीय संस्थेकडून (NBFC) घेतलेले कर्ज बुडवलेले असता कामा नये

६. संयुक्त कर्ज (ज्यामध्ये मुदत कर्ज आणि खेळते भांडवल समाविष्ट आहे) दहा लाख रुपये ते एक कोटी दरम्यान प्रदान करण्यात येते.

७. बँकेने ठरवल्याप्रमाणे कर्ज तारण सुरक्षा किंवा क्रेडिट गॅरंटी फंड योजनेच्या हमीद्वारे सुरक्षित केले जाऊ शकते.

८. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि महिला उद्योजकांसाठी कर्जाचा वापर फक्त व्यापार, सेवा आणि उत्पादन क्षेत्रात नवीन उद्योग सुरू करण्यासाठी केला जाऊ शकतो.

९. कर्ज परतफेडीचा कालावधी कमाल ७ वर्षांपर्यंत आहे आणि कमाल स्थगिती कालावधी १८ महिन्यांपर्यंत आहे

१०. स्टँड-अप इंडिया योजनेअंतर्गत कोणतीही सबसिडी दिली जात नाही.

३.३.५ स्टँड अप इंडिया योजनेतील तरतुदी:-

१. स्टँड अप इंडिया योजनेस भारतीय लघु उद्योग विकास बँके द्वारा (SIDBI) १०,००० कोटी रुपये वित्तपुरवठा केला जाणार आहे.

२. स्टँड अप इंडिया योजनेअंतर्गत भारतातील व्यापारी बँकेचा प्रत्येक बैंक शाखेतून किमान २ स्टैंड अप प्रकल्पांना लाभ प्राप्त होणार आहे.

३. स्टँड अप इंडिया योजनेअंतर्गत भारत सरकारच्या केंद्रीय अर्थ मंत्रालयाचा वित्तीय सेवा विभाग समन्वयक म्हणून तर राष्ट्रीय पत हमी विश्वस्त कंपनीचे संचालक देण्यात येणाऱ्या कर्जाची हमी घेतील.

३.३.६ स्टँड अप इंडिया योजनेची परिणामकारकता:-

स्टँड अप इंडिया या योजने अंतर्गत मार्च २०२२ पर्यंत ३० हजार १६० कोटी रुपये मंजूर करण्यात आले असून ते १ लाख ३३ हजार ९९५ बँक खात्यांमध्ये वर्ग करण्यात आले आहेत. २०१६ मध्ये सुरु झालेल्या या योजनेद्वारे अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीमधल्या नागरिकांना आणि महिलांना उद्योग उभारणीसाठी कर्जपुरवठा केला जातो.

स्टँड अप इंडिया योजना ही अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि महिला प्रवर्गातील उद्योजकांच्या उत्थानासाठी, आर्थिक सक्षमीकरण, रोजगार आणि उद्योजकतेला चालना देण्यासाठी उपलब्ध असलेल्या सर्वोत्तम योजनांपैकी एक आहे. भारत सरकारने ५ एप्रिल २०१६ रोजी स्टैंड-अप इंडिया योजना सुरू केली. संपूर्ण भारतातील १.७४ लाख बँकांमध्ये ही योजना उपलब्ध करून देण्यात आली आहे.

३.४ मुद्रा लोन (प्रधान मुद्रा योजना - PMMY):-

मुद्रा (MUDRA) कर्ज/लोन योजना 'मेक इन इंडिया' मोहिमेच्या सहकार्याने प्रारंभ करण्यात आलेली योजना आहे. जी भारत सरकारने नाविन्यपूर्णतेला चालना देण्यासाठी गुंतवणूक सुलभ करण्यासाठी, कौशल्य विकासात सुधारणा करण्यासाठी आणि देशातील सर्वोत्तम उत्पादन पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी सुरू केली आहे. मुद्रा लोन या योजनेस प्रधानमंत्री मुद्रा योजना (PMMY) या नावाने ओळखले जाते. प्रधानमंत्री मुद्रा योजना (PMMY) देशाचे माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ८ एप्रिल २०१५ रोजी सुरू केली.

३.४.१ मुद्रा (MUDRA) योजना काय आहे?

मुद्रा म्हणजे मायक्रो-युनिट्स डेव्हलपमेंट आणि रिफायनान्स एजन्सी (MUDRA) होय. प्रधानमंत्री मुद्रा योजना (PMMY) ही बिगर-कॉर्पोरेट, बिगर-शेती लघु/सूक्ष्म नवीन उद्योग चालू करणे आणि लघु उद्योगांचा विस्तार करण्यासाठी उद्योजकांना ५०,००० ते १० लाखापर्यंत कर्ज देण्याच्या उद्देशाने चालू केलेली योजना आहे.

३.४.२ प्रधानमंत्री मुद्रा कर्ज योजनेची उद्दिष्टे:-

मुद्रा कर्ज विविध कारणांसाठी घेतले जाऊ शकते जे रोजगार निर्मिती आणि उत्पन्न निर्माण करण्यात मदत करतात. प्रधानमंत्री मुद्रा कर्ज योजनेची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे.

१. दुकानदार, व्यापारी, विक्रेते आणि सेवा क्षेत्रातील इतर क्रियाकलापांसाठी व्यावसायिक कर्जे उपलब्ध करून देणे.

२. लघु उद्योग घटकांसाठी उपकरणे खरेदीसाठी वित्तपुरवठा करणे.

३. मुद्रा कार्डद्वारे कार्यरत भांडवली कर्ज उपलब्ध करून देणे.

४. वाहतूक वाहन कर्ज वितरीत करणे.

५. कुक्कुटपालन, मधमाशीपालन, मत्स्यपालन इ. यांसारख्या कृषी संलग्न क्रियाकलापांमध्ये गुतलेल्या लोकांना कर्वे उपलब्ध करून देणे.

६. जे लोक व्यावसायिक कामांसाठी ट्रॅक्टर, मशागत यंत्र आणि दुचाकी वापरतात अश्या घटकांना कर्जे वितरित करणे.

३.४.३ मुद्रा योजनेअंतर्गत समाविष्ट वित्तीय संस्था:-

१. व्यापारी बँका ( Commercial Banks)

२. प्रादेशिक ग्रामीण बँका (Regional Rural Banks)

३. सूक्ष्म वित्त संस्था [मायक्रो फायनान्स संस्था (MFIs)]
४. बिगर बँकिंग वित्तीय संस्था [नॉन-बँकिंग वित्तीय कॉर्पोरेशन्स - (NBFCs)]
५. लघु वित्त बँका (लहान वित्त बँका)

३.४.४ मुद्रा कर्ज योजनेचे लाभार्थी:-

१. व्यवसाय विक्रेते
२. दुकानदार
३. कृषी क्षेत्र
४. अन्न उत्पादन उद्योग
५. हस्तकलाकार
९. लघु उद्योजक
७. स्वयंरोजगार उद्योजक
८. जीर्णोद्धार (पुन:स्थापना) आणि दुरुस्तीची दुकाने
९. सेवा आधारित कंपन्या
१०. ट्रक मालक

३.४.५ मुद्रा कर्ज योजनेचे प्रकार:-

प्रधानमंत्री मुद्रा योजनेचे (PMMY) शिशु, किशोर आणि तरुण असे तीन प्रमुख प्रकार पडतात त्यांचे विश्लेषण पुढिलप्रमाणे -

| अ.क्र. | योजनेचे नाव | कर्ज रक्कम |
|---|---|---|
| १ | शिशु | मुद्रा लोन योजनेअंतर्गत असणाऱ्या शिशु मुद्रा लोन या प्रकारा अंतर्गत ५०,००० रुपयांपर्यंतची कर्जे वरील घटकांसाठी वितरित करण्यात येतात. |
| २ | किशोर | किशोर मुद्रा लोन प्रकाराच्या माध्यमातून ५०,००० ते ५,००,००० रुपयांपर्यंतचे कर्ज व्यावसायिकांना वितरित करण्यात येतात. |
| ३ | तरुण | तरुण या मुद्रा लोन योजनेअंतर्गत व्यावसायिक आणि उद्योजकांसाठी त्यांच्या व्यवसायासाठी ५,००,००० ते १०,००,००० रुपयापर्यंतच्या कर्जाचे वितरण करण्यात येते. |

३.४.६ मुद्रा कर्ज योजने अंतर्गत समाविष्ट उपक्रम:-

विविध प्रकारचे उत्पादन विषयक व्यवसाय व उपक्रम चालवण्यासाठी ज्यांना पैशाची आवश्यकता आहे. अशा व्यक्ती किंवा घटक मुद्रा कर्ज योजनेअंतर्गत अर्ज करू शकतात, त्यानंतर त्यांना कर्जाचे वितरण करण्यात येते. मुद्रा कर्ज योजने अंतर्गत पुढील उपक्रमांचा समावेश होतो.

१. अन्न उत्पादने क्षेत्र: मुद्रा कर्ज योजनेअंतर्गत अन्नप्रक्रिया उद्योगामध्ये पुढील व्यवसायांसाठी वितरित

करण्यात येते.

२. (लोणचे बनवणे, पापड बनवणे, जेली किंवा जॅम बनवणे, केटरिंग, लहान सेवा खाद्यपदार्थांचे स्टॉल, कोल्ड स्टोरेज, आईस्क्रीम बनवण्याचे युनिट, कोल्ड चेन वाहने, गोड पावरोट आणि ब्रेड बनवणे इत्यादी.)

३. माल वाहतूक आणि प्रवासी वाहतूक या दोन्हींसाठी वापरण्यात येणारी वाहतूक वाहने या अंतर्गत पुढील वाहतूक साधना साठी मुद्रा कर्ज वितरित करण्यात येते. (ऑटो रिक्षा, तीनचाकी, प्रवासी कार, ई-रिक्षा, टॅक्सी इत्यादी वैयक्तिक वाहतूक वाहने खरेदी करणे.

४. वैयक्तिक, सामुदायिक आणि सामाजिक कार्य सेवाविषयक उपक्रमः मुद्रा कर्ज योजनेअंत पुढील वैकि सामुदायिक आणि सामाजिक कार्यासाठी वित्तपुरवठा प्रदान करते. (मेडिकल शॉप, बुटीक, सलून, जिम, ड्राय क्लीनिंग, ब्युटी पार्लर मोटारसायकल रिपेअर शीप, टेलरिंग शॉप, कुरिअर सर्व्हिस, फोटोकॉपी आणि डीटीपी सेंटर्सशी संबंधित व्यवसाय किंवा उपक्रम).

५. दुकानदार आणि व्यापाऱ्यांसाठी व्यवसाय कर्ज:

(ज्या लोकांना त्यांचे दुकान, सेवा उपक्रम, व्यवसाय आणि उपक्रम चालू करणे)

६. कापड उत्पादने क्षेत्र आणि त्यांच्याशी संलग्न उपक्रमः कापड उत्पादन व त्यासंबंधी संलग्न पुढील उपक्रमासाठी मुद्रा लोन व्यावसायिकांना प्रदान करण्यात येते. (पॉवरलूम, हातमाग, चिकन/जरदोजी वर्क, खादी उपक्रम. पारंपारिक छपाई आणि रंगकाम, विणकाम, संगणकीकृत भरतकाम, फॅब्रिकवरील डिझाइन इत्यादी व्यवसाय आणि उपक्रम सुरु करणे.)

७. शेतीशी संबंधित उपक्रमः शेती क्षेत्राशी संलग्नित पुढील उपक्रमासाठी मुद्रा कर्ज वितरीत करण्यात येते.(मधमाशी पालन, मत्स्यपालन, गुरेढोरे, वर्गीकरण, कृषी चिकित्सालय इत्यादी)

८. सूक्ष्म युनिट्स उपकरण वित्त योजना: सूक्ष्म युनिट्स उपकरण संलग्नित पुढील उपक्रमासाठी मुद्रा कर्ज वितरीत करण्यात येते. (सूक्ष्म उद्योग सुरू करण्यासाठी आवश्यक असलेली उपकरणे किंवा यंत्रसामग्री खरेदी करणे इत्यादी).

३.४.७ मुद्रा कर्ज योजनेची वैशिष्ट्ये:-

मुद्रा कर्जाची मुख्य वैशिष्ट्ये आणि फायदे पुढीलप्रमाणे.

१. भारतीय नागरिक ज्यांचे उत्पादन, व्यापार किंवा सेवा क्षेत्रामध्ये व्यवसाय आणि उपक्रम चालू करण्याचे नियोजन आहे आणि ज्यांना १०,००००० रुपयापर्यंत कर्जाची आवश्यकता आहे. अशा व्यक्ती मुद्रा कर्जासाठी अर्ज करू शकतात.

२. भारतीय नागरिक कि ज्यांचे किमान वय १८ वर्षे आणि कमाल वय ६५ वर्षे अशा व्यक्ती मुद्रा कर्जासाठी अर्ज करू शकतात.

३. सार्वजनिक क्षेत्रातील खाजगी क्षेत्रातील बँकर, प्रादेशिक ग्रामीण बैंक (RRB) लघु वित्त बैंक (SFBs), आणि सूक्ष्म वित्त संस्था (MFIs) इत्यादी वित्तीय संस्थांच्या माध्यमातून ही कर्जे उपलब्ध करून दिली जातात व लाभार्थींना या योजनेचा लाभ घेतला जाऊ शकतो.

४. नवीन व्यवसाय आणि उपक्रम चालू करायचा आहे किंवा आणि विद्यमान व्यवसाय किंवा उपक्रमाचा विस्तार करण्याची आवश्यकता आहे अशा व्यक्तींना या योजनेअंतर्गत कर्ज मिळू शकते.

५. मुद्रा कर्ज योजनेअंतर्गत कर्ज घेताना कोणतीही तारण किंवा तृतीय पक्षाने सुरक्षा किंवा हमी देण्याची आवश्यकता नसते. कर्जदाराची क्रेडिट गॅरेंटी सरकारकडून घेतली जाते. त्यामुळे कर्जदार कर्ज घेतलेल्या रकमेची परतफेड करू शकत नसल्यास नुकसानीची जबाबदारी सरकारची असेल.

६. ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही ठिकाणी बँकिंग आणि वित्तीय सेवांचा लाभ घेता येतो.

७. ज्या भागात लोकांना मूलभूत बँकिंग सुविधा उपलब्ध नाहीत अशा भागात या योजनेद्वारे आर्थिक मदत उपलब्ध आहे.

८. सूक्ष्म लहान व्यवसाय आणि स्टार्ट-अपद्वारे आर्थिक पाठबळ मिळू शकते.

९. या योजनेद्वारे कर्ज घेतलेला निधी केवळ व्यावसायिक कारणासाठी वापराला लागती.

१०. परवडणाऱ्या व्याजदरात छोट्या रकमेसाठी व्यवसाय कर्ज घेता येते.

११. अन्न विक्रेते, दुकानदार आणि इतर छोटे व्यावसायिक या योजनेचा जास्तीत जास्त फायदा येऊ शकतात.

१२. योजनेचा परतफेड कालावधी सात वर्षापर्यंत वाढू शकतो.

१३. महिला कर्जदार सवलतीच्या व्याजदरात कर्ज घेऊ शकतात.

१४. मुद्रा कर्जाचा व्याजदर अर्जदाराच्या प्रोफाइलवर अवलंबून असतो. सार्वजनिक क्षेत्रातील तसेच खाजगी क्षेत्रातील अनेक बँका मुद्रा कर्ज देतात. या सर्वच वित्तीय संस्थांची काही निश्चित

मार्गदर्शक तत्वे असतात. ज्यामध्ये अर्जदाराला कर्ज प्रदान केल्या जाणाऱ्या व्याजाचा अंतिम दर हा निश्चित केलेला असतो.

३.४.८ कंपनी पासून PMMY अंतर्गत उपलब्ध:-

२०१५-१६ पासून ते २०२०-२१ आणि २०२१-२२ वर्षातील पहिल्या सहामाही अखेरपर्यंत मुद्रा कर्ज योजनेच्या प्रगतीचा तपशील पुढीलप्रमाणे -

| अ. क्र. | आर्थिक वर्ष | मंजूर पी. एम. एम. वाय. कर्जाची संख्या | मंजूर रक्कम (कोटी रुपये) | वितरित केलेली रक्कम (कोटी रुपये) |
|---|---|---|---|---|
| १ | २०१५-१६ | ३४८८०९२४ | १,३७,४४९.२ | १.३२,९५४.७ |
| २ | २०१६-१७ | ३९७०१०४७ | १,८०,५२८.५४ | १,७५,३१२.१३ |
| ३ | २०१७-१८ | ४८१३०५१३ | २,५३,६७७.१ | २,४६,४३७.४ |
| ४ | २०१८-१९ | ५८९८७०३१८ | ३,२१,७२२.७९ | ३,११,८११.३८ |
| ५ | २०१९-२० | ६२२४७६०६ | ३,२९,७१५.०३ | ३,३७,४९५.५३ |
| ६ | २०२०-२१ | ५०७३५०४६ | ३,२१,७५९.२५ | ३,११,७५४.४७ |
| ७ | २०२१-२२ | ३४१९८१९० | २,०७,५३५.६३ | २,००,६१७.२४ |

स्रोत : वार्षिक अहवाल - मुद्रा : 2015-16 ते 2020-21.

८ एप्रिल २०१५ रोजी सुरु करण्यात आलेल्या प्रधानमंत्री मुद्रा योजनेअंतर्गत पहिल्या वर्षी २०१५-१६ या वर्षामध्ये मंजूर पी. एम. एम. वाय. कर्जाची संख्या ३,४८,८०९२४ इतकी होती त्यांना १,३७,४४९,२ कोटी रुपये मंजूर करण्यात आले त्यापैकी १,३२,९५४.७ कोटी रुपये वितरित करण्यात आले. पुढे प्रत्येक आर्थिक वर्षामध्ये मुद्रा योजनेअंतर्गत मंजूर पी.एम.एम.वाय. कर्जाची संख्या मंजूर कर्जाची रक्कम आणि वितरित करण्यात आलेल्या कर्जाची रक्कम ही सातत्याने वाढलेली असल्याचे दिसून येते. २०२०-२१ मध्ये मंजूर पी.एम.एम.वाय. कर्जांची संख्या इतकी ५,०७,३५,०४६ होती त्यांना ३,२१,७५९.२५ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत त्यापैकी ३,११,७५४.४७ कोटी रुपये वितरित करण्यात आलेले आहेत.

३.५ दुग्ध व्यवस्थापन विकास योजना:-

देशामध्ये दुग्ध उद्योगांचा विकास घडून यावा आणि देशामध्ये दुग्ध व्यवसायातील क्रियांमध्ये सुलभता यावी यासाठी भारत सरकारने विविध दुग्ध विकास योजना राबविलेल्या आहेत. त्याशिवाय त्यांचे व्यवस्थापन व अंमलबजावणी करण्याची जबाबदारी वेगवेगळ्या संस्थांना देण्यात आलेली आहे. त्यामुळे निश्चितच देशातील शेतकऱ्यांना याचा लाभ होत आहे. भारतातील दुग्ध विकास योजना आणि त्यांचे व्यवस्थापन करणाऱ्या संस्था पुढीलप्रमाणे-

३.५.१ दुग्ध उद्योजकता विकास योजना:-

पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय आणि मत्स्यव्यवसाय विभाग दुग्धव्यवसाय क्षेत्रात स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी दुग्ध उद्योजकता विकास योजना (DEDS) राबवत आहे, ज्यामध्ये दुधाचे उत्पादन वाढवणे, खरेदी, जतन, वाहतूक, प्रक्रिया आणि दुधाचे विपणन यासारख्या क्रियांचा समावेश होतो. या योजनेचे व्यवस्थापन राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक (नाबार्ड) द्वारे करण्यात येते.

योजनेचे उद्दिष्टे:-

१. स्वच्छ दुधाच्या उत्पादनासह आधुनिक डेअरी फार्म उभारण्यास प्रोत्साहन देणे.

२. गायी वासरांच्या संगोपनास प्रोत्साहन देण्यासाठी चांगला प्रजनन साठा जतन करणे.

३. असंघटित क्षेत्रात संरचनात्मक बदल घडवून आणणे जेणेकरून दुधाची प्राथमिक प्रक्रिया गावपातळीवरच करता येईल.

४. व्यावसायिक स्तरावर दूध हाताळण्यासाठी गुणवत्ता आणि पारंपारिक तंत्रज्ञान सुधारणे.

५. स्वयंरोजगार निर्माण करणे आणि मुख्यतः असंघटित क्षेत्रासाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे.

अंमलबजावणी/व्यवस्थापन एजन्सी:-

दुग्ध उद्योजकता विकास योजनेची अंमलबजावणी ही 'राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बैंक (नाबार्ड)' द्वारे करण्यात येते.

३.५.२. गोवंश प्रजनन आणि दुग्ध विकासासाठी राष्ट्रीय कार्यक्रम (NPBBDD):-

पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विभागाच्या गाय आणि मम प्रजननासाठी राष्ट्रीय प्रकल्प (NPCBB). गहन डेअरी विकास कार्यक्रम (IDDP), गुणवटा आणि स्वच्छ दूध उत्पादनासाठी पायाभूत सुविधा मजबूत करणे आणि सहकारी संस्थांना मदत (SIQ आणि CMP) अशा चार योजनांचे विलीनीकरण करून गोवंश प्रजनन आणि दुग्ध विकासासाठी राष्ट्रीय कार्यक्रम (National Programme for Bovine Breeding & Dairy Development (NPBBDD) योजना तयार करण्यात आली.

NPBBDD घटक: गोवंश प्रजनन आणि दुग्ध विकासासाठी राष्ट्रीय कार्यक्रम या योजनेमध्ये दोन घटक आहेत.

१. गोवंश प्रजननासाठी राष्ट्रीय कार्यक्रम (NPBB), आणि

२. डेअरी विकासासाठी राष्ट्रीय कार्यक्रम (NPDD).

फायदे:-
१. गाव, गट आणि जिल्हा स्तरावर दूध शीतकरण सुविधा
२. बल्क मिल्क कूलर (BMC) आणि शीतकरण केंद्रासाठी उपकरणे
३. दूध प्रक्रिया आणि विपणन
४. दूध आणि दुग्धजन्य पदार्थ चाचणी प्रयोगशाळांचे बांधकाम स्थापना
५. स्वच्छ दूध उत्पादन संच
६. दुग्ध सहकारी संस्था आणि दूध संघासाठी खेळते भांडवल
७. नियोजन आणि देखरेख

अंमलबजावणी/व्यवस्थापन एजन्सी:-
गोवंश प्रजनन आणि दुग्ध विकासासाठी राष्ट्रीय कार्यक्रम या योजनेची अंमलबजावणी ही राज्य स्तरावर अंमलबजावणी करणारी संस्था 'राज्य दुग्ध संघ (State Dairy Federation) आणि इतर बाबतीत 'दूध संघा (Milk Unions) या संस्थेद्वारे करण्यात येते.

३.५.३. राष्ट्रीय गोकुळ मिशन:-
प्रजनन मार्गांमध्ये निवडक प्रजनन आणि वर्णन नसलेल्या गोवंशीय जातींच्या अनुवांशिक सुधारणाद्वारे स्थानिक जातींच्या विकास आणि संवर्धनासाठी डिसेंबर २०१४ मध्ये 'राष्ट्रीय गोकुळ मिशन (RGM)' ही योजना सुरू करण्यात आली. या योजनेत गोजातीय प्रजननासाठीचा राष्ट्रीय कार्यक्रम [National Programme for Bovine Breeding (NPBB)] आणि गोजातीय प्रजनन क्षमता राष्ट्रीय मिशन [National Mission on Bovine Productivity (NPBB)) या दोन योजनांचा समावेश आहे.
ही योजना १०० टक्के अनुदानाच्या आधारावर राबविण्यात आली आहे आणि तो देशभर चालवली जाते. जात, वर्ग आणि लिंग विचारात न घेता ग्रामीण गुरे आणि म्हैस पाळणाऱ्यांना याचा फायदा होऊ शकतो.

योजनेचे उद्दिष्टे:-
१. स्वदेशी जातींचा विकास आणि संवर्धन करणे.

२. रोगमुक्त उच्च अनुवांशिक गुणवत्तेची मादी गाईंची संख्या वाढवून दुग्धोत्पादन आणि उत्पादकता वाढवणे आणि रोगांचा प्रसार रोखणे.
३. नैसर्गिक सेवेसाठी रोगमुक्त उच्च अनुवाशिक गुणवत्तेचे बळू वाटप करणे व त्या दर्जाची व्यवस्था करणे.
४. शेतकऱ्यांच्या दारात कृत्रिम रेतन (AI) सेवा देणे.

अंमलबजावणी/ व्यवस्थापन एजन्सी:-
राष्ट्रीय गोकुळ मिशनची अंमलबजावणी ही राज्य अंमलबजावणी संस्था (SIA)' या संस्थेद्वारे करण्यात येते.

३.५.४. राष्ट्रीय कृत्रिम रेतन कार्यक्रम (NAIP):-
राष्ट्रीय कृत्रिम रेतन कार्यक्रम [Nationwide Artificial Insemination Programme (NAIP) ही योजना सप्टेंबर २०१९ मध्ये ६ महिन्यांत १ कोटी पेक्षा जास्त गोवंशांचे बीजारोपण करण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आली. हा कार्यक्रम राष्ट्रीय गोकुळ मिशन (RGM) अंतर्गत १०० टक्के अनुदानाच्या आधारावर
समाविष्ट आहे.

योजनेचे उद्दिष्टे:-

१. पशु आधार कान-टैग (Ear-tay with 'Pashu Aadhaar') करून प्राण्यांना एक अद्वितीय ओळख देणे जेणेकरून सरकार विशिष्टपणे प्राण्यांची ओळख आणि करू शकेल.
२. पशुच्या जातीसह (गाय, म्टेस), वय, लिंग आणि त्यांचा मालकांच्या तपशीलांसह प्रत्येक गाय आणि म्हशीला रंग करणे,

अंमलबजावणी/व्यवस्थापन एजन्सी:-
राष्ट्रीय कृत्रिम रेतन कार्यक्रम या योजनेची अंमलबजावणी ही 'राज्य पशुधन विकास मंडळ दूध महासंघ या संस्थेद्वारे करण्यात येते. अंतिम अंमलबजावणी करणाऱ्या एजन्सीमध्ये पशुसंवर्धन विभागांचाही समावेश होतो.

३.६ फलोत्पादन व्यवस्थापन विकास कार्यक्रम:-

देशामध्ये फलोत्पादनाचा विकास घडून यावा या हेतूने भारत सरकारने 'फलोत्पादन समूह विकास कार्यक्रम ही योजना प्रारंभ केले आहे.

३.६.१ फलोत्पादन समूह विकास कार्यक्रम:-

बागायती उत्पादनांच्या निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने फलोत्पादन समूह विकास कार्यक्रम (CDP) सुरू केला आहे. फलोत्पादन ही वनस्पती शेतीची शाखा आहे जी आग पिके, सामान्यतः फळे, भाज्या आणि शोभेच्या वनस्पतीशी संबंधित आहे.

फलोत्पादन समूह विकास कार्यक्रम हा एक केंद्रीय क्षेत्रातील कार्यक्रम आहे. ज्याचा उद्देश फलोत्पादन वाढवणे आणि विकसित करणे आणि त्यांना जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनवणे असा आहे.

प्रायोगिक टप्प्यात, या कार्यक्रमासाठी निवडलेल्या एकूण ५३ समूहापैकी १२ फलोत्पादन समूहामध्ये हा कार्यक्रम राबविला जात आहे.

फलोत्पादन कार्यक्रम या योजनेची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे:-

१. पूर्व उत्पादन, उत्पादन, काढणीनंतरचे व्यवस्थापन, लॉजिस्टिक, विपणन आणि ग्रेंडिंग यासह भारतीय फलोत्पादन क्षेत्राशी संबंधित सर्व प्रमुख समस्यांचे निराकरण करणे.

२. भौगोलिक विशेषीकरणाचा लाभ घेण्यासाठी आणि फलोत्पादन क्लस्टर्सच्या एकात्मिक आणि बाजाराच्या नेतृत्वाखालील विकासाला प्रोत्साहन देणे.

३. कृषी पायाभूत सुविधा निधीसारख्या सरकारच्या इतर उपक्रमांशी एकत्र येणे.

व्यवस्थापन / अंमलबजावणी:-

समूह विकास कार्यक्रम या योजनेची अंमलबजावणी ही कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या राष्ट्रीय फलोत्पादन मंडळ (NHB)' या संस्थेद्वारे करण्यात येते. फलोत्पादन समूह विकास कार्यक्रमातील समूह है अलस्टर डेव्हलपमेंट एजन्सीज (CDAs)' द्वारा व्यवस्थापित केले जातील जे संबंधित राज्य/केंद्रशासित प्रदेश सरकारच्या शिफारशीवर नियुक्त केले जातात.

अपेक्षित लाभः-

फलोत्पादन समूह विकास कार्यक्रम ही योजना सर्व ५३ क्लस्टरमध्ये लागू केल्यावर या कार्यक्रमामुळे सुमारे १० लाख शेतकऱ्यांना फायदा होईल आणि १०,००० कोटी रुपयाची गुंतवणूक आकर्षित होण्याची अपेक्षा आहे

## ३.७ कृषीमाल विक्री व्यवस्थापन योजना:-

कृषिमाल विक्री व्यवस्थापनालाच कृषी विपणन व्यवस्थापन म्हणून संबोधिले जाते. कृषिमालाचे उत्पादन झाल्यानंतर शेतकऱ्यांना त्यांच्या आर्थिक अडचणी भागविणे क्रमप्राप्त असते. त्यामुळे योग्य किंमत प्राप्त न होताही तो विक्री करावा विकावा लागतो. त्यामुळे अल्पभूधारक व सीमांत शेतकऱ्यांची प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे आर्थिक पिळवणूक होत राहते. कृषी उत्पादकांना अशा आर्थिक पिळवणुकीतून पूर्णपणे मुक्त करता येणे शक्य जरी नसले तरी कृषिमाल विक्री व्यवस्थापनाद्वारे त्यामध्ये काही प्रमाणात सुधारणा करता येणे शक्य आहे.

कृषिमाल विक्री व्यवस्थापनात प्रतवारी, कृषी मालाचे पॅकेजिंग व त्याचे फायदे, कृषी मालाची वाहतूक. कृषी मालाची साठवणूक आणि शेतमालाची विक्री इत्यादींचा समावेश होतो. भारतामध्ये कृषिमाल विक्री व्यवस्थापनासंदर्भात राबविण्यात आलेल्या आणि कार्यरत असणाऱ्या योजनांचा आढावा पुढील प्रमाणे.

### ३.७.१ ई-नाम (ई-नाम):-

राष्ट्रीय कृषी बाजार ई-नाम (National Agriculture Market (eNAM)] हे संपूर्ण भारतातील इलेक्ट्रॉनिक ट्रेडिंग पोर्टल आहे. जे कृषी मालासाठी एकसंध राष्ट्रीय बाजारपेठ तयार करण्यासाठी विद्यमान कृषी उत्पन्न बाजार समिती (Agricultural Product Market Committees- APMC ) आणि घाऊक बाजाराचे (Mandis) नेटवर्क करते.

स्थापना:-

राष्ट्रीय कृषी बाजाराची स्थापना १४ एप्रिल २०१६ रोजी करण्यात आली. राष्ट्रीय कृषी बाजाराचे व्यवस्थापन हे भारत सरकारच्या कृषी मंत्रालय अंतर्गत करण्यात येते.

स्मॉल फार्मर्स अँग्रीबिझनेस कन्सोर्टियम (SFAC) ही भारत सरकारच्या कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या अंतर्गत eNAM ची अंमलबजावणी करणारी प्रमुख एजन्सी आहे.

व्हिजन:-

एकात्मिक बाजारपेठेत प्रक्रिया सुव्यवस्थित करून, खरेदीदार आणि विक्रेते यांच्यातील माहितीची विषमता काढून टाकून आणि वास्तविक मागणी आणि पुरवठ्यावर

आधारित रिअल टाइम किंमत शोधला प्रोत्साहन देऊन कृषी विपणनामध्ये एकसमानतेला प्रोत्साहन देणे.

मिशन :-

कृषी मालामध्ये संपूर्ण भारतात व्यापार सुलभ करण्यासाठी उत्पादनाच्या गुणवत्तेवर आधारित पारदर्शक लिलाव प्रक्रियेद्वारे वेळेवर ऑनलाइन पेमेंटसह उत्तम किंमत शोध प्रदान करण्यासाठी एका सामान्य ऑनलाइन मार्केट प्लॅटफॉर्मद्वारे देशभरातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे (APMCS) चे एकत्रीकरण करणे.

व्याप्ती:-

राष्ट्रीय कृषी बाजार या योजनेअंतर्गत भारतातील १८ राज्ये आणि २ केंद्रशासित प्रदेशांमध्ये १,००० कृषी उत्पन्न बाजार समित्या आणि ५७५ ऑनलाइन व्यापार मंडी कार्यरत आहेत. यामध्ये महाराष्ट्र राज्यात १९८ कृषी उत्पन्न बाजार समित्या (APMCs) आणि ६६ ऑनलाइन व्यापार पाऊक बाजार (Mandis) आहेत.

अंमलबजावणी एजन्सी

लघु शेतकरी शेती व्यवसाय महासंघ [Small Farmers Agribusiness Consortium (SFAC)] हे राष्ट्रीय कृषी बाजार (NAM) के प्रमुख प्रवर्तक आहेत. या संस्थेद्वारे राष्ट्रीय कृषी बाजाराचे व्यवस्थापन करण्यात येते. लघु शेतकरी शेती व्यवसाय महासंघ (SFAC) हा कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या अंतर्गत कृषी, सहकार आणि शेतकरी कल्याण (DAC&FW) विभागाची नोंदणीकृत संस्था आहे.

३.७.२ कृषी विपणनासाठी एकात्मिक योजना:-

शेतकऱ्यांची जिद्द आणि परिश्रम, कृषी शास्त्रज्ञांचे समर्पण आणि धोरणकर्त्यांचे सातत्यपूर्ण प्रयत्न यांनी एकत्रितपणे स्वातंत्र्याच्या वेळी भारतीय शेतीला अन्नधान्याच्या आयातदारापासून आता अन्नधान्याच्या मोठ्या निर्यातदारामध्ये बदलण्यात योगदान दिले आहे. शेतकऱ्यांना एकीकडे कोल्ड चेन लॉजिस्टिक्ससह पुरेशा पायाभूत सुविधांसह स्पर्धात्मक बाजारपेठांपर्यंत पोहोचण्याची गरज आहे. ज्यामुळे त्यांना एकीकडे चांगल्या किंमती मिळू शकतील आणि दुसरीकडे ग्राहकांना पौष्टिक अन्न स्थिर आणि परवडणाऱ्या किमतीत मिळू शकेल.

हा उद्देश लक्षात घेऊन, भारत सरकारने १३ नोव्हेंबर २०१३ रोजी १२ व्या पंचवार्षिक योजने दरम्यान (२०१२-२०१७) चालू असलेल्या केंद्रीय क्षेत्रातील योजनांना कृषी

विपणनासाठी एकात्मिक योजना' चालू ठेवण्यासाठी आणि एकत्रीकरणासाठी कृषी आणि सहकार विभागाच्या प्रस्तावाला मंजुरी दिली.

कृषी विपणनासाठी एकात्मिक योजनेच्या उपयोजना:-

१. ग्रामीण भंडारन योजना आणि कृषी विपणन पायाभूत सुविधांचा विकास बळकटीकरण, प्रतवारी आणि प्रमाणीकरण ह्या योजना कृषी विपणन पायाभूत सुविधा या योजनेत विलीन केल्या जातील.

२. विपणन संशोधन आणि माहिती नेटवर्क

३. अँगमार्क (Agmark) ग्रेडिंग सुविधांचे बळकटीकरण

४. व्हेंचर कॅपिटल असिस्टन्स आणि प्रकल्प विकास सुविधाद्वारे कृषी व्यवसाय विकास आणि

५. चौधरी चरण सिंग राष्ट्रीय कृषी विपणन संस्था

कृषी विपणनासाठी एकात्मिक योजनेची उद्दिष्टे:-

१. राज्य सरकार, सहकारी आणि खाजगी क्षेत्रातील गुंतवणुकीला बॅकएंड सबसिडी सहाय्य देऊन कृषी विपणन पायाभूत सुविधांच्या निर्मितीला प्रोत्साहन देणे.

२. वैज्ञानिक साठवण क्षमता निर्मितीला प्रोत्साहन देणे आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी प्रतिज्ञा वित्तपुरवठा करण्यास प्रोत्साहन देणे.

३. प्राथमिक प्रक्रियेसह शेतकऱ्यांचे अनुलंब एकीकरण प्रदान करण्यासाठी एकात्मिक मूल्य साखळी (केवळ प्राथमिक प्रक्रियेच्या टप्प्यापर्यंत मर्यादित प्रोत्साहन देणे.

४. कृषी विपणनातील नवीन आव्हानांना प्रतिसाद देण्यासाठी शेतकऱ्यांना संवेदनशील बनवण्यासाठी आणि त्यांना अभिमुख करण्यासाठी विस्ताराचे साधन म्हणून माहिती व संपर्क तंत्रज्ञानाचा (ICT) वापर करणे.

५. शेतकरी आणि इतर भागधारकांद्वारे त्याचा कार्यक्षम आणि वेळेवर वापर करण्यासाठी बाजारपेठेतील माहिती आणि आवक आणि किमतींवरील माहितीचे जलद संकलन आणि प्रसार करण्यासाठी देशव्यापी माहिती नेटवर्क प्रणाली स्थापित करणे.

६. शेतांना त्यांच्या प्रतवारीत उत्पादनासाठी चांगल्या आणि किफायतशीर किमती मिळवून देण्यासाठी ग्रेड मानके तयार करणे आणि कृषी मालाचे गुणवत्ता प्रमाणपत्र तयार करणे.

७. कृषी व्यवसाय प्रकल्पांच्या स्थापनेत खाजगी गुंतवणुकीला चालना देणे आणि त्याद्वारे उत्पादकांना खात्रीशीर बाजारपेठ उपलब्ध करून देणे आणि उत्पादक आणि त्यांच्या गटांशी कृषी व्यवसाय प्रकल्पांचे मागासलेले संबंध मजबूत करणे.

८. कृषी विपणन क्षेत्रात प्रशिक्षण, संशोधन, शिक्षण, विस्तार आणि सल्लामसलत हाती घेणे आणि प्रोत्साहन देणे.

**----------XXX—OO—XXX----------**
**----------XXX—OO—XXX----------**
**----------XXX—OO—XXX----------**